MHPU090018072018

किरकोळ अर्ज क्र.५०६/२०१८

## अंतरीम पोटगी आदेश फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५०६/२०१८

प्रस्तृतचा अर्ज कलम २३ नुसार अर्जदार कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ अंतर्गत अर्जदार हिने तिचा मुळ अर्जास अनुसरुन दाखल केलेला आहे. सदरचा अर्जात शपथेवर तिने न्यायालयास जाबदेणार क्र.१ अर्जदार क्र.१ व २ यांना अन्न, वस्त्र, निवारा व पालन पोषण इत्यादीसाठी दरमहा १०,०००/–; प्रतिबंधात्मक आदेश; लाईट बिल व पाणी बिल रु.१०,०००/– तसेच त्यांना राहण्याकरीता कायमस्वरुपी जाग; अर्जदार क्र.१ व २ करिता वैद्यकीय खर्च व अर्जदार क्र.२ यांच्या शैक्षणिक खर्चासाठी दरमहा रु .१५,०००/–; मानसिक व शारिरक छळाकरीता रु.३०,०००/– करीता हुकुम याचना केली आहे.

०२. जाबदेणार १ ते २ यांनी **नि.क्र.१०** वर प्रस्तृतचा अर्ज यास त्यांचे म्हणणे सादर करुन शपथेवर कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही तसेच मागितलेल्या याचना करीता कोणतेही कारण नाही. तसेच कार्यक्षेत्रचे आधावर प्रस्तुतचा अर्ज खारिज होण्यास पात्र आहे . अर्जदार क्र.१ हिने पैसे उकळण्याकरीता खोटया कथा रचल्या आहेत . प्रस्तुतचा अर्ज फक्त त्रास देणे व मोठी रक्कम उकळणेकरीता असद्भपुर्वक दाखल केलेले आहेत. अर्जदार क्र.१ हिने प्रस्तुतचा अर्ज सुडापोटी गैरअर्जदार याने तिचे विरोधात घटस्पोटाचा अर्ज क्र.१५२/२०१८ मा. कौटुंबिक न्यायालय यांच्या न्यायालयासमोर दाखल केल्यामुळेच दाखल केला आहे. जाबदेणार यांनी अर्जदार यांची अर्जातील सर्व कथने जशाचतशी नाकारली आहेत . तसेच कथन केले की , देवांश अर्जदार क्र.२ हा त्यांना दि.०९/०१/२०१६ रोजी जन्मला आहे. अर्जदार हिने सासर सोडुन माहेरी सर्व दागिने घेवुन आई–वडिलांचे सांगणेनुसार गेलेली आहे . त्याने अर्जदार हिला परत घरी बोलवले असता तिने त्याला शिवीगाळ केली आणि पैशाची मागणी केली . तसेच त्यांना धमकी दिली की, तिची मागणी पुर्ण करा अथवा ती त्यांना खोटया केसमध्ये अडकवेल.

०३. तसेच शपथेवर कथन केले की, जाबदेणार याने अर्जदार हिचे चारित्र्यावर

कधीही संशय घेतला नाही तसेच तिला स्वातंत्रय दिले आहे . अर्जदार हिने वैवाहिक संबंध पुर्नस्थापीत करण्याकरीता कोणतेही प्रयत्न केले नाहीत . अर्जदार हि उद्धट व तटखोर आहे. तसेच अर्जदार ही कुरकुर, तक्रार व सतावणारी आहे. तिने जाबदेणार क्र.१ याला नेहमी शिवीगाळ व अशोभनीय भाषा वापरलेली आहे . जाबदेणार क्र.१ हा आरेखण अभियंता असुन त्यास दरमहा रु.७१,०००/– पगार आहे. तसेच त्यास बरेचसे कर्जे असुन तो हप्ते भरण्यास जबाबदार आहे त्यामुळे त्याच्याकडे फक्त रक्कम रु.२०,०००/– हातात राहतात. तसेच त्याने किवळे येथे सन २०१३ येथे सदनिका खरेदी केले असुन त्यास दरमहा वीस हजार रुपये हप्ता पडतो . तसेच त्याच्याकडे एक टाटा कार रु.५ लाख कर्जावर घेतलेली असुन दरमहा हप्ता रु.९,०००/– आहे. तसेच त्यास दरमहा रु.९,०००/– घडभाडे द्यावे लागते . जाबदेणार क्र.१ याला रु.९५,०००/– प्रतिमहिना पगार नसुन तो कायमस्वरुपी पगारदार नाही. तसेच त्यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तो त्याचे मुलाला दरमहा ₹ . १,५००/– पालन–पोषण म्हणुन देण्यास तयार आहेत. अर्जदार हिने रु.१५,०००/– कशासाठी लागतात याचे वर्णन दिलेले नाही याउलट तिला मोठा पगार मिळतो. तसेच तिने जाबदेणार यांचा त्याग केलेले आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ हि कायद्याप्रमाणे कोणतीही रक्कम मिळण्यास पात्र नाही. तसेच ती बीसीएस असुन इटन टेक्नॉलॉजी या कंपनीत तिला दरमहा रु.४५,०००/– पगार मिळतो तसेच ती स्वत:ला सांभाळण्यास सक्षम आहे. तो अर्जदार यांना स्वीकारन्यास आजही तयार आहे. त्याने अर्जदार हिला अतिरिक्त रक्कम तिच्या गरजा पुरविण्याकरीता दिले आहे.

**०४.** तसेच शपथेवर कथन केले की, अर्जदार हिने तिला लागणा –या पैशाकरीताचे विवरण व पुरावा दिलेला नाही . अर्जदार ही अर्जदार क्र.२ यांना घेवुन माहेरी राहत आहे. अर्जदार हिने स्वत:हुन जाबदेणार क्र.१ यांचा त्याग केला असल्यामुळे ती स्वतंत्र घरात राहण्याची याचना करु शकत नाही . त्याला भेटण्याचे अधिकार आठवडयाच्या शेवटी देण्यात यावे कारण की , अर्जदार क्र.१ हिचा तटखोरपणामुळे अर्जदार क्र.२ यांना प्रेम व जिव्हाळा जाबदेणा –यांचा मिळत नाही. अर्जदार हिने रोहन यांना जाबदेणा –याने रु.५०,०००/– दिले नाही महणुन भांडण केले होते . तसेच अर्जदार हिची जाबदेणार यांच्यापासुन वेगळे राहण्याची इच्छा पुर्वीपासुनच आहे . त्याने मित्र व नातेवाईकांसोबत बरेचसे कार्यक्रम , विधी व कौटुंबिक कार्यक्रम यात हजेरी लावली आहे. अर्जदार हिच्या आईने अर्जदार हिला छोटया छोटया कारणांवरुन

भांडण्यास करण्यास प्रवृत्त केलेले आहे. त्यामुळे तो नोकरीचे कामावर केंद्रित होवुन शकत नाही. त्याने प्रसुती व औषोधपचाराचा खर्च रु.१,५०,०००/– सोसला आहे.

**०५.** तसेच शपथेवर कथन केले की, अर्जदार हि नेहमी तिच्या नातेवाईकांकडे राहण्याकरीता हट्ट करत असे. त्यामुळे त्याने चिंचवड येथे सदनिका भाडयाने घेतले . परंतु, दुर्भाग्य की, अर्जदार हिचे आई –वडिलांनी जाबदेणार क्र.१ याचे संगत सोडण्याकरीता तिल प्रवृत्त केले. त्यास नवीन विमाननगर येथे मिळाल्यामुळे व चिंचवड हे लांब पडत असल्यामुळे विश्रांतवाडी येथे सदनिका भाडयाने घेण्याचे ठरवले परंतु अर्जदार हिने तेथे स्थलांतरीत होण्याकरीता नकार दिला व तिचे आई –वडिलांचे घरी सर्व दाग–दागिने घेवुन परत न येण्याच्या इराध्याने निघुन गेली . अर्जदार हिला ऐशोआराम जिवन जगण्याची सवय आहे जेव्हा की त्यास उत्पन्न कमी आहे . त्याने अर्जदारांना त्याचे सोबत परत राहणेकरीता प्रयत्न केले असता तिचे आई –वडिलांनी त्याचे कडुन खुप मोठी रक्कम मागितली व नाही दिले तर, जेलमध्ये टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे तो नैराश्याचे जीवन जगत आहे. तो त्याची वैवाहिक जाबाबदारी पार पाडण्यास आजही तयार आहे. परंतु, अर्जदार हिने त्याच्या संगतीचा त्याग केला आहे. त्यामुळे अर्जदार हिचे अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

**०६.** मुळ अर्ज, प्रस्तृतचा अर्ज, जाबदेणार यांचे **नि.क्र.१०** व दोन्ही बाजूच्या पक्षांचे कथन, युक्तीवाद पाहता खालील मुद्दे माझे विचारार्थी आहेत व त्यांचे निष्कर्ष कारणांसहीत पुढीलप्रमाणे:–

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हिचा जाबदेणार क्र.१ व २ यांनी कौटूंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते काय? | ... होकारार्थी |
| २ | अर्जदार क्र. १ व २ हे जाबदेणार क्र.१ कडून पोटगी म्हणून रक्कम रू.१०,०००/- मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होकारार्थी. |
| ३ | अर्जदार ही कलम १८, १९ व २० याचना आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होकारार्थी. |
| ४ | अंतिम आदेश काय ? | अंशत: मान्य. |

## कारणमिमांसा

## <u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u>

**०५.** अर्जदार हिने अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व जाबदेणार यांची कथने व युक्तीवादातील मुद्दे लक्षात घेतला असता त्यांनी जाबदेणार यांचेवर बरेचसे आरोप केलेले आहेत व त्यासंबंधी विस्तृत पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अर्जदार क्रमांक १ हिने तिच्या कथनाच्या पृष्टयर्थ **<u>नि.क्र.३</u>** सोबत दस्तऎवजांच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच अर्जदार हिने तिचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र **<u>नि.३९</u>** वर दाखल केले आहे. याउलट जाबदेणार श्री. प्रसाद यांनी त्यांचे कथनाच्या पृष्र्थ मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र **<u>नि.३०</u>** दाखल केली.

**०६.** अर्जदार यांनी लेखी युक्तीवाद **नि.क्र.४०** केला तसेच तोंडी युक्तीवादसुध्दा लेखी युक्तीवादाप्रमाणेच केला. अर्जदार यांचा लेखी युक्तीवाद की, जाबदेणार क्र.१ यांनी त्यांची नोकरी अर्जदार क्र.२ यांना पोटगी मिळु नये म्हणुन जास्त पगाराची नोकरी सोडुन व्यवसाय करत असल्याचे कागदपत्र दाखल केले आहेत . प्रस्तुतचे प्रकरण दाखल केल्यानंतर मेडिएशन व्दारे ती नांदावयास गेली परंतु जाबदेणार हा तिला व्यवस्थीत नांदवत नाही व अर्जदार क्र.२ यांची काळजी व जबाबदारी घेत नाही. तसेच दारु पिवुन धिंगाना करुन त्यांना घराबाहेर काढतो. जाबदेणार यास ७० ते ७५ हजार पुर्वीपासुन पगार आहे व ते तो पगार सोडुन रुपये १८ हजाराचा व्यवसाय करु शकतील का ? जाबदेणार याने प्लॅट, कार अर्जदार क्र.२ यास पोटगी देता येवु नये म्हणुन कमी किमतीत विकल्याचे दाखवले आहे. जाबदेणार क्र.१ यास दोन भाऊ आहेत व ते आई–वडिलांची जबाबदारी सांगतात.अर्जदार पत्नी व मुलगा यांची कोणतीही जाबाबदारी जाबदेणार क्र.१ यांनी उचलली नाही. जाबदेणार याचे राहणीमान उच्च दर्जाचे असुन तो दरवर्षी आई – वडिलांसह परदेशात फिरायला जातो. परंतु, मुलाची कोणतीही जाबाबदारी घेत नाही. जाबदेणार क्र.१ याचे आई–वडिल बेळगाव येथे प्रशस्त बंगल्यात राहतात व त्यांचे गाळे भाडयाने दिले आहेत व भाडे एक लाख रुपये मिळते . तसेच दहा ते पंधरा गुंठे वडिलोपार्जित जागा आहे. तसेच अर्जदार क्र.१ ही तिची नोकरी सांभाळुन मुलाला सांभाळते. परंतु, कोव्हीड महामारीमुळे तिच्या नोकरीचा भरवसा नाही. जाबदेणार याने धर्तपणे उत्पान्नाचे पुरावे दाखविलेले आहेत. परंतु, आयटीआर, पासबुक, बॅंक स्टेटमेंट दाखल केलेले नाहीत. तसचे बेळगावचे जागेचे कागदपत्रे दाखवले नाहीत जेणे करुन जाबदेणार यांचे उत्पन्न दिसुन येईल. त्यामुळे तिने विनंती केली की, अर्जदार नं.२ याचा

खर्चाचा विचार करुन **नि.क्र.५** वर हुकुम करावा.

**०७.** याउलट जाबदेणार अधिवक्ता यांनी युक्तीवाद केला की, जाबदेणार यांनी अर्जदार हिचे सर्व कौटूंबिक हिंसाचाराचे आरोप नाकारले आहेत. तसेच आता जाबदेणार क्र.१ यास फक्त रु.२० हजार पगार मिळतो . तसेच जाबदेणार क्र.१ याच्याकडे घर, गाडी व कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच जाबदेणार क्र.१ या सदरमहा १८ हजार रुपये उत्पन्न मिळते. जाबदेणार क्र.१ याची नोकरी गेल्याबाबत **नि.क्र.३२** वर दस्त दाखल केलेला आहे. जाबदेणार क्र.१ याचे अधिवक्ता याने युक्तीवाद केला की , जाबदेणार क्र.१ मुलास पोटगी देण्यास तयार आहे. अर्जदार क्र.१ ही नोकरी करते व तिला पोटगी देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे **नि.क्र.५** खालील अर्ज फेटाळण्यात यावा.

०८. प्रस्तुतचा अर्ज, मुळ अर्ज व जाबदेणार यांचे **नि.क्र.१०** व दोन्ही पक्षाने दाखल केलेली कागदपत्रे पाहिली तसेच युक्तीवाद दस्त वाचले. अर्जदार हिचा कलम १२ व कलम २३ कौटुंबिक हिसांचार कायदा अर्ज पाहिला असता त्यात कौटुंबिक हिंसाचार हा ती जाबदेणार यांच्यासोबत कौटुंबिक संबंधाने राहत असतांना झाल्याचे दिसून येते उदाणार्थ– छोटया–छोटया कारणांवरुन अर्जदार हिला मिळालेल्या पगाराची मागणी करणे; पैसे नसतील तेव्हा जाबदेणार हा अर्जदार हिला शिवीगाळ करुन अंगावर धावुन येत असे; परकेपणची वागणुक देणे व संशय घेणे ; नोकरीच्या ठिकाणी तुझे कुणाशीतरी अनैतिक संबंध असे घाणेरडे आरोप करणे; घरातील वस्तु फेकाफेकी करुन दहशत निर्माण करणे; तसेच घरातील किमती वस्तु आदळा –आपट करुन नुकसान करणे; पैशावरुन टोमणे मारणे; अर्जदार बाळास जेवण भरत असताना मुलाचा ग्लास जबरदस्तीने तिच्या तोंडातुन काढुन जमिनीवर फेकुन देणे; गळा दाबुन ढकलुन देणे, तसेच दि.२८/०५/२०१७ या रोजी घरात राहायचे नाही म्हणुन माहेरी कायमची निघुन असे सांगुन अंगावरच्या कपडयानिशी तिला मुलासह घराबाहेर हाकलुन दिले . अर्जदार क्र.१ हिने शपथेवर कथन केलेल्या सदर बाबीमधुन हे स्पष्ट होते की , प्रथमदर्शनी अर्जदारावर कौटुंबिक हिसांचार झालेला आहे. तसेच कलम २३ कौटुंबिक हिंसाचार कायदा अंतरिम याचना मंजुरीकरीता प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा कसे न्यायालयाने पाहणे आवश्यक असते.

०९. जरी अर्जदार क्र.१ व २ यांनी त्यांचे अंतरिम याचना अर्ज **नि.क्र.५** खालील अर्जा त याचना केल्या की, अर्जदार क्र.१ व २ यांना अन्न, वस्त्र, निवारा व

पालन पोषण इत्यादीसाठी दरमहा १०,०००/-; प्रतिबंधात्मक आदेश; लाईट बिल व पाणी बिल रु.१०,०००/- तसेच त्यांना राहण्याकरीता कायमस्वरुपी जाग; अर्जदार क्र.१ व २ करिता वैद्यकीय खर्च व अर्जदार क्र.२ यांच्या शैक्षणिक खर्चासाठी दरमहा रु.१५,०००/-; मानसिक व शारिरक छळाकरीता रु.३०,०००/- करीता हुकुम व्हावे. परंतु, अर्जदार यांनी नि.क्र.४० खाली लेखी युक्तीवाद सादर करतांना या न्यायालयास विनंती केली की, अर्जदार क्र.२ याच्या खर्चाचा विचार करुन नि.क्र.५ वर हुकुम करावा . याचाच अर्थ की, अर्जदार क्र.१ हिने तिच्याबाबतच्या काही याचना अंतरिम स्वरुपात मागणी केलेल्या नाहीत व मुळ अर्ज कलम १२ याचना हक्क अबाधीत ठेवल्या आहेत. तसेच जाबदेणार क्र.१ याने सुध्दा न्यायालयासमोर मान्य केले की, तो त्याचे मुलास पोटगी देण्यास तयार आहे. त्यामुळे न्यायोचित होईल की, जाबदेणार क्र.१ याने अर्जदार क्र.२ नामे देवांश याचा शिक्षणाचा संपुर्ण खर्च जसे की , शाळेची वार्षिक फिस, खाजगी शिकवणी फिस, वहया पुस्तकांचा खर्च, गणवेश व खेळाचा खर्च, सहली व समारंभ खर्च व प्रतिमहिना पाच हजार रुपये पोटगी पुढील आदेश होईपर्यंत सोसावा. प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार अर्जदार क्र.१ वर झाल्याचे दिसुन येत असल्यामुळे अर्जदार क्र.२ हा सदर याचनेस पात्र आहे. तसेच जाबदेणार क्र.१ याने अर्जदार यांचे वीज बिल, पाणी बिल खर्च सुध्दा सोसावा व त्याबाबतचे दस्त अभिलेखावर दाखल करावे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ यांचे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

**अ**. अर्जदार हिचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

**ब**. जाबदेणार क्र.१ याने अर्जदार क्र.२ देवांश यास दरमहा रक्कम रू.५,०००/ – (पाच हजार रूपये फक्त) अंतरिम पोटगी ही मुळ अर्ज दाखल दि. २३/०५/२०१८ पासून ते अंतिम निकाल लागेपर्यंत देण्यास आदेशीत करण्यात येत आहे. तसेच जाबदेणार क्र.१ याने अर्जदार क्र.२ देवांश याचे शिक्षणाचा संपुर्ण खर्च जसे की , शाळेची वार्षिक फिस, खाजगी शिकवणी फिस, वहया पुस्तकांचा खर्च, गणवेश व खेळाचा खर्च, सहली व समारंभ खर्च अंतिम निकाल लागेपर्यंत देण्यास आदेशीत करण्यात येत आहे. तसेच जाबदेणार क्र.१ याने अर्जदार यांचे वीज बिल, पाणी बिल खर्च सुध्दा सोसावा व त्याबाबतचे दस्त अभिलेखावर दाखल करावे.

**क.** सदर आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत अर्जदार हिने तिचे पुराव्याचे शपथपत्र प्रतिज्ञापत्र दाखल न केल्यास अथवा प्रकरण चालविण्याकरीता उचीत पावले न घेतल्यास योग्य ते आदेश पारित करण्यात येतील.

**ड.** सदर आदेशाची प्रत संबंधीत पोलीस स्टेशन व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

**इ.** अर्जदार व जाबदेणार यांना सदर आदेशाची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by MORE MAROTI GOVINDRAO
Date: 2023.02.06 19:43:16 +0530

पिंपरी, पुणे (मा. गो. मोरे)

दिनांक :-०३/०२/२०२३ **३ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**पिंपरी, पुणे.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are the same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer :- P. D. Kadam [StenoIII]

Court :- M.G.More 3rd Jt. J.M.F.C., Pimpri Pune.

Date :- 03/02/2023

Order signed by
the Presiding Officer on :- 03/02/2023

Order uploaded on :-06/02/2023